मानव विकास कार्यक्रमात अंमलबजावणीच्या दृष्टीने सुधारणा करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन,**
**नियोजन विभाग,**
**शासन निर्णय क्र.:- माविका-२०१२ /प्र.क्र. ६९/का.१४१८**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२**
**दिनांक १२ जुलै, २०१२**

वाचा - शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.:- माविमि -२०१०/प्र.क्र. ८१ /का.१४१८,दि. १९ जुलै, २०११

**प्रस्तावना :-**

राज्यातील मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती १२ जिल्ह्यांतील २५ तालुक्यांवरुन वाढवून सदर कार्यक्रम सन २०११-१२ पासून ठाणे, रायगड, सिंधुदूर्ग, नाशिक, धूळे, नंदूरबार, जळगाव, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या २२ जिल्ह्यांतील १२५ तालुक्यांमध्ये राबविण्याचा निर्णय शासनाने संदर्भांकित शासन निर्णयान्वये घेतला आहे. सन २०११-१२ या आर्थिक वर्षामधील कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या आढाव्यासाठी घेतलेल्या बैठकीमध्ये सदर कार्यक्रमामध्ये काही सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. या बाबीचा विचार करुन तसेच सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे व्हावी आणि या कार्यक्रमाचा लाभ अधिकाधिक लोकांना मिळावा या दृष्टीकोनातून सदर कार्यक्रमामध्ये काही सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या प्रस्तावास अनुसरुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

१. मानव विकास कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच सदर कार्यक्रमाचा लाभ अधिकाधिक लोकांना मिळावा या उद्देशाने मानव विकास कार्यक्रम सन २०१२-१३ पासून निवडलेल्या १२५ तालुक्यांतील 'क' वर्ग नगरपालिकांमध्ये राबविण्यात येईल. सदर कार्यक्रमाचे नगरपालिका स्तरावरील संनियंत्रण संबंधित नगरपालिकांचे मुख्याधिकारी करतील. याशिवाय सदर नगरपालिका क्षेत्रात राबवावयाच्या योजना, त्यांचे निकष, योजनांना/कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार, निविदा व खरेदीची प्रक्रीया आणि वित्तिय बाबी ह्या सर्व बाबी उपरोक्त संदर्भित शासन निर्णयानुसारच कायम राहतील. योजना राबविण्यात येणाऱ्या 'क' वर्ग नगरपालिकांची यादी सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दिली आहे.

२. मानव विकास कार्यक्रम प्रभावीपणे व गतिमानतेने राबविण्याकरीता गट विकास अधिकारी यांचेकडे फक्त कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे काम सोपविण्यात येत आहे व यापुढे सर्व प्रकारच्या प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

३. योजनांना प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर जिल्हाधिकारी संबंधित जिल्हास्तरीय यंत्रणांना निधी वितरीत करतील. तथापि, कार्यक्रमांतर्गत झालेल्या खर्चाचा हिशोब तालुकानिहाय ठेवण्यात यावा. तसेच सदरचा खर्च तालुक्यासाठी विहित केलेल्या निधीच्या मर्यादेत असावा.

४. मानव विकास कार्यक्रमांतर्गत तालुक्यास प्राप्त होणाऱ्या एकूण निधीपैकी १० टक्के निधीतून जिल्हा मानव विकास समितीच्या मान्यतेने मानव विकास निर्देशांक उंचावण्यासंबंधीच्या नाविन्यपूर्ण योजना राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच नाविन्यपूर्ण योजनांवर १० टक्केपेक्षा अधिक निधी खर्च करावयाचा असल्यास असे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी आयुक्त, मानव विकास यांचेमार्फत शासनास सादर करावेत.

५. मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या बाबतीत शासन स्तरावरुन निर्धारित करण्यात आलेल्या योजनानिहाय उद्दिष्टांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार २५% पर्यंत बदल (कमी किंवा जास्त) करण्याचे अधिकार जिल्हा मानव विकास समितीस सुपूर्द करण्यात येत आहेत.

६. "फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा सुरु करणे" या योजनेअंतर्गत कृषी विज्ञान केंद्रांकडून पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यास साखर कारखाने, खत कारखाने/कंपन्या किंवा अन्य योग्य संस्था यांना जिल्हा मानव विकास समितीच्या सहमतीने सदरच्या कार्यक्रमात समाविष्ट करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. "इयत्ता आठवी ते बारावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या आणि शाळेपासून ५ कि.मी. अंतराचे आत राहणाऱ्या गरजू मुलींना सायकलींचे वाटप करणे" या योजनेस मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत सायकलचे दोन ब्रँड ठरवून सायकल खरेदी प्रक्रीयेचे तसेच योजनेच्या अंमलबजावणीबाबतचे निकष आयुक्त, मानव विकास आयुक्तालय, औरंगाबाद हे स्वतंत्रपणे निर्गमित करतील. तसेच या योजनेवरील खर्च तालुक्यासाठी उपलब्ध होणाऱ्या निधीच्या जास्तीत जास्त १० टक्के पर्यंत सिमित राहील.

८. "इयत्ता ५ वी ते ८वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना विज्ञान केंद्राला भेट देण्यास प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने प्रत्येक विद्यार्थ्याला रु. १०/- इतके अनुदान देणे" या योजनेस मान्यता देण्यात येत आहे. या योजनेबाबतचे निकष आयुक्त, मानव विकास आयुक्तालय, औरंगाबाद हे स्वतंत्रपणे निर्गमित करतील. तसेच या योजनेवर प्रति तालुका रु. १.०० लक्ष इतका खर्च अनुज्ञेय राहील.

९. मानव विकास कार्यक्रमांतर्गत गरोदर महिलांच्या आरोग्य तपासणीच्या प्रत्येक कॅम्पसाठी रु. १४,५००/- इतक्या खर्चास संदर्भित शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. तथापि, या एकूण खर्चाची बाब निहाय मर्यादा शासन निर्णयात नमूद करण्यात आली नसल्याने प्रत्येक कॅम्प करीता मंजूर करण्यात आलेल्या एकूण खर्चाचे अधिन राहून बाबनिहाय खर्चात २५% पर्यंत बदल (कमी किंवा जास्त) करण्याचे अधिकार जिल्हा मानव विकास समितीस सुपूर्द करण्यात येत आहेत.

१०. मानव विकास कार्यक्रमांतर्गत किशारी प्रशिक्षण कार्यक्रम राबवितांना १ हजार ते २ हजार लोकसंख्या असलेल्या गावांसाठी एक किशोरी प्रशिक्षण केंद्र, तर दोन हजारपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांकरीता दोन प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर योजना

आदिवासी भागात राबवितांना गावातील किमान १ हजार लोकसंख्येची अट शिथिल करुन ५०० लोकसंख्येचे गाव/पाडा/वाडीसाठीही एक किशोरी प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

११. मानव विकास कार्यक्रमांतर्गत सुरु करावयाच्या अथवा चालवावयाच्या अभ्यासिकेसाठी MPSC - UPSC तसेच अन्य वेगवेगळया स्पर्धा परिक्षा व कौशल्य व्यवसाय विकासाशी निगडीत पुस्तके खरेदी प्रति तालुका रु. २०,०००/- च्या मर्यादेत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु. ना. शिंदे)
अवर सचिव, नियोजन विभाग

प्रति,

१) मा.राज्यपालंचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) मा. मंत्री/राज्यमंत्री , यांचे खाजगी सचिव,
५) मा.कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, नवीन प्रशासकीय भवन, १८ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
६) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
७) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
८) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
९) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
१०) शासनाचे मुख्य सचिव,
११) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२) महासंचालक,यशदा,पुणे
१३) सदस्य सचिव, उर्वरीत वैधानिक विकास मंडळ, नवीन प्रशासकीय भवन, १८वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
१४) सदस्य सचिव, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, तळ मजला, औरंगाबाद
१५) सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, B-२३/१, साऊथ अंबाजरी मार्ग, अंध विद्यालयाजवळ, नागपूर
१६) आयुक्त, मानव विकास आयुक्तालय, बाबा पेट्रोलपंपजवळ, अदालत रोड, औरंगाबाद
१७) विभागीय आयुक्त, (सर्व)
१८) जिल्हाधिकारी, (सर्व)
१९) मुख्य कार्यकारी अधिकारी,(सर्व)
२०) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय
२१) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२२) अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२३) उपायुक्त, नियोजन, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व)